K. S. Wani Memorial Trust
NEWS LETTER
Editorial Committee :
Prof. Dr. Shobha Shinde (Chief Editor)
Ms. Vaishali Songire (Asst. Editor) &
Prof. Mr. Prasad Puranik (Co-Editor)
Volume No.24 | January – March 2024 | K. S. Wani Memorial Trust Reg. No.E352

# भारतीय मराठी अभ्यास परिषदेचे ३४ वे अधिवेशन संपन्न

का.स.वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्था, धुळे आणि आदर्श कला, वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने कुळगाव-बदलापूर जिल्हा ठाणे येथे दि.१ व २ मार्च २०२४ रोजी परिषदेचे ३४ वे अधिवेशन व राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न झाले. ‘मराठी भाषा आणि साहित्य संशोधन’ हा चर्चासत्राचा विषय होता.

व्यासपीठावर आदर्श विद्याप्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा.उदयजी कोतवाल, का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठानचे अध्यक्ष आणि उदघाटक सी.ए.श्री.शशिकांत धामणे, का.स.वाणी संस्थेच्या संचालिका प्रा.डॉ.वंदना महाजन, महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.संगीता पांडे, य.च.म.मुक्त विद्यापीठाचे सेवानिवृत्त संचालक डॉ.रमेश वरखेडे आदी मान्यवर उपस्थित होते. श्री.धामणे यांच्या हस्ते अधिवेशनाचे उदघाटन झाले. प्राचार्य डॉ.संगीता पांडे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. डॉ.वंदना महाजन यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

उदघाटनपर भाषणात श्री. धामणे यांनी का.स.वाणी संस्थेत सुरु असलेल्या महत्वाकांक्षी प्रकल्पाची आणि विविध उपक्रमांची माहिती दिली. प्राध्यापक आणि संशोधक अभ्यासकांनी अशा परिषदांचा आणि चर्चासत्राचा लाभ घेऊन आपल्या ज्ञानात अधिक भर घालावी असे सांगितले. यानंतर डॉ. रमेश वरखेडे यांनी अभ्यासपूर्ण बीजभाषण सादर केले. ते म्हणाले मराठी संशोधनाची, भाषेची अभिव्यक्ती क्षमता वाढावी, बोली व प्रमाणभाषेतील दरी कमी व्हावी यासाठी भाषा अभ्यायासाचे महत्त्व अधोरेखित केले. यानंतर संस्थेचे अध्यक्ष श्री.उदय कोतवाल यांचे अध्यक्षीय भाषण झाले. ते म्हणाले भाषेत अनेक वेगवेगळ्या भाषेतील शब्द वापरल्याने भाषा प्रवाही राहते, भाषेत नावीन्य येते. हे सांगतांना त्यांनी फादर स्टीफन्स यांच्या ‘ख्रिस्तपुराण’ या ग्रंथाचा दाखला दिला. उदघाटन सत्राचे आभार मराठी विभागप्रमुख डॉ.संदीप भेले यांनी मानले.




दोन दिवसांच्या अधिवेशनात डॉ.सुधाकर शेलार, डॉ.सुनील रामटेके, डॉ.गोविंद काजरेकर, डॉ.फुला बागुल, डॉ.वासुदेव वले, डॉ.वाल्मिक आढावे, डॉ.मीनाक्षी बऱ्हाटे, डॉ.रणधीर शिंदे, डॉ.संजय करंदीकर, डॉ.पृथ्वीराज तौर यांनी वक्ते म्हणून सहभाग नोंदविला.
५ सत्रात सत्राध्यक्ष आणि वक्त्यांनी सविस्तर चर्चा घडवून आणली. पहिल्या सत्रात अध्यक्षीय भाषणात डॉ.मंगला वरखेडे यांनी संशोधनाचे नवे पैलू श्रोत्यांना उलगडून दाखवले. ‘भाषा आणि जीवन’ या विषयावर सखोल संशोधन व्हायला हवे असे त्यांनी नवसंशोधकांना आवाहन केले. दुसऱ्या सत्रात डॉ.प्रमोद मुनघाटे यांनी अध्यक्षीय भाषणातून सत्रामध्ये झालेल्या विस्तृत चर्चेवर प्रकाश टाकत ‘संशोधन’ हे सक्तीचे कार्य नसून ते ऐच्छिक कार्य आहे, असे प्रतिपादन केले.

तिसऱ्या सत्राचे अध्यक्ष डॉ. निळकंठ शेरे यांनी वाङ्मयीन चौर्य आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या संशोधनातील अडचणी यावर विस्तृत चर्चा केली. संशोधन करतांना कोणती आव्हाने पेलावी लागतात याचेही सविस्तर विश्लेषण केले. चौथ्या सत्राचे अध्यक्ष डॉ.विनोद कुमरे यांनी संशोधनामध्ये नियतकालिकांचा वापर याविषयांतर्गत सविस्तर चर्चा घडवून आणली. नियतकालिकांमुळे सामाजिक राजकीय प्रबोधन घडून येते याकडे लक्ष वेधले. शेवटच्या पाचव्या खुल्या सत्राचे अध्यक्ष डॉ.अलका मटकर यांनी आपल्या भाषणातून संशोधक विद्यार्थ्यांना ‘वेळ घ्या परंतु व्यवस्थित अभ्यास करा’ असे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी आपली ध्येय धोरणे निश्चित करुन मेहनत घेवून यशाकडे मार्गक्रमण करावे, असे मोलाचे मार्गदर्शन केले.

मुंबई विद्यापीठाचे माजी मराठी विभागप्रमुख डॉ. अनिल सपकाळ यांच्या अध्यक्षतेखाली समारोप समारंभ संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर आदर्श महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.संगीता पांडे, का.स.वाणी संस्थेच्या संचालिका डॉ.वंदना महाजन, डॉ.संदीप भेले आदी मान्यवर उपस्थित होते. प्रथम मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.यावेळी प्राचार्या डॉ.संगीता पांडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ.वंदना महाजन यांनी का.स.वाणी संस्थेच्या निर्मिती संदर्भातला मुख्य उद्देश स्पष्ट केला. संशोधन आणि त्यातील विविध तात्विक मुद्दे त्यांनी स्पष्ट केलीत. शेवटी अध्यक्षीय भाषणात डॉ. अनिल सपकाळ यांनी संशोधन व त्यातील विविध दृष्टिकोन श्रोत्यांपुढे स्पष्ट केले. सत्रांमध्ये कोणकोणते मुद्दे हाताळले गेले याबाबत सखोल चर्चा झाली. तसेच संशोधन करतांना कोणत्या महत्वाच्या गोष्टी लक्षात ठेवणे गरजेचे आहे यावर विस्तृत मार्गदर्शन केले. संशोधनाची नवी दिशा अभ्यासकांसमोर मांडली, वेगवेगळे पैलू उलगडून दाखविले. आभार प्रदर्शनाने सत्राचा समारोप करण्यात आला.

सदर चर्चासत्रात मुंबई विद्यापीठासह अनेक संशोधक विद्यार्थ्यांनी सहभागी होऊन लाभ घेतला. सुमारे १०० हून अधिक श्रोते उपस्थित होते. पैकी सुमारे ६० हून अधिक नोंदणीकृत प्राध्यापक व विद्यार्थ्यांचा यात समावेश होता. परिषदेच्या दोन दिवसात संस्थेच्या प्रकाशनाची समाधानकारक ग्रंथविक्री झाली.

## प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

देशाला सार्वभौमत्व मिळून ७५ वर्षे पूर्ण झालीत, नुकताच स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव संपूर्ण देशात साजरा करण्यात आला. त्याच प्रमाणे आपल्या संस्थेत देखील २६ जानेवारी २०२४ हा ७५ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे विश्वस्त मा. श्री. जितेंद्र सोनगिरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करून राष्ट्र ध्वजाला मानवंदना देण्यात आली. या वेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



ध्वजवंदनास उपस्थित पदाधिकारी व कर्मचारी

## अखिल भारतीय साहित्य संमेलनास ग्रंथविक्री व प्रदर्शन

अमळनेर येथे दि. २, ३ व ४ फेब्रुवारी २०२४ दरम्यान अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात का. स. वाणी मराठी प्रगत अध्ययन संस्थेच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिद्ध झालेल्या ग्रंथांची विक्री व प्रदर्शनासाठी स्टॉल लावण्यात आला होता.

या निमित्ताने ग्रंथविक्रीस अल्प प्रतिसाद जरी मिळाला असला तरी आमची श्रीवाणी अंक व पुस्तकांचे शीर्षक वाचकांपर्यंत पोहचणे महत्वाचे होते. वाचकांनी व ग्रंथप्रेमींनी त्यांचा आनंद घेतला. यासाठी प्रा. निलेश पाटील, प्रा. प्रसाद पुराणिक, ग्रंथपाल श्री. मिलिंद दीक्षित व विद्यार्थी शैलेश पाटील यांनी परिश्रम घेतले.




अमळनेर येथे ग्रंथविक्री व प्रदर्शन

## विद्यार्थ्यांची यशोगाथा




मी सौरभ विजय वाल्हे, मुळचा धुळे शहरातील रहिवासी, माझ्या वडिलांचा लॉन्ड्री चा व्यवसाय आहे व आई गृहिणी, आणि एक मोठा भाऊ आहे. मी दहावी उत्तीर्ण झाल्यानंतर घरची आर्थिक स्थिती पहाता वड़ीलाना व्यवसायात मदत करू लागलो आणि त्याचबरोबर ११ वी व १२ वी चे शिक्षणही घेतले.

मी १२ वी उत्तीर्ण झाल्यानंतर वडिलांच्या मार्गदर्शनाने का. स. वाणी मुद्रण शिक्षण संस्थेत मुद्रण तंत्रकला पदविका अभ्यासक्रमास प्रवेश घेतला आणि मला त्या क्षेत्राविषयी आवड निर्माण झाली. संस्थेत शिक्षण घेत असताना श्री. प्रसाद पुराणिक सरांनी मला खूप चांगले मार्गदर्शन केले आणि मी शेवटच्या वर्षी असताना संस्थेच्या मदतीने मुंबई शहरात मला नोकरीची संधी मिळाली होती .

२०१७ - १८ या शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण करून मी माझ्या कामाची सुरुवात मुंबई शहरात केली, त्या नंतर असेच पुढचे सहा वर्षे भारतात विविध शहरांच्या उद्योग समुहात कामाचा अनुभव घेतला. त्यानंतर मला २०२४ या वर्षी कुवैत देशात काम करण्याची संधी मिळाली आहे. मी कुवैत या देशात आलो आणि मी आज यशस्वीपणे येथे काम करत आहे. आज माझ्या यशाने माझा परिवार खूप आनंदी आहे .

माझ्या या प्रवासात का.स. वाणी संस्थेने व संस्थेच्या अध्यापकांनी खूप चांगले मार्गदर्शन केल्याबद्दल मी त्यांचा खूप आभारी आहे. संस्थेच्या भावी वाटचालीस माझ्यातर्फे खूप खूप शुभेच्छा !!

## डॉ. अविनाश सांगोलेकर यांची संस्थेस सदिच्छा भेट

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. अविनाश सांगोलेकर यांनी का. स. वाणी संस्थेच्या ग्रंथालयाला दि. ०६ फेब्रुवारी २०२४ रोजी सदिच्छा भेट दिली. संस्थेचे विश्वस्त श्री. जितेंद्र सोनगिरे यांनी ग्रंथ भेट देऊन त्यांचे स्वागत केले तसेच डॉ. सांगोलेकर यांना संस्थेची आणि ग्रंथालयाची सविस्तर माहिती दिली. संस्थेतील विधायक उपक्रम व प्रकल्प सुरु असल्याचे पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले . आजच्या काळात मराठी भाषेचा विकास व संवर्धन करण्यासाठी अशा संस्थेची गरज असल्याचे सांगितले . डॉ सांगोलेकर यांनी संस्थेचे ग्रंथपाल श्री. मिलिंद दीक्षित यांना ग्रंथालयासाठी स्वतःची दोन पुस्तके भेट म्हणून दिली.



मा.डॉ. अविनाश सांगोलेकर ग्रथ भेट स्वीकारताना

## कवयित्री नीरजा यांची संस्थेला सदिच्छा भेट



कवयित्री नीरजा ग्रथ भेट स्वीकारताना

सुप्रसिद्ध स्त्रीवादी लेखिका कवयित्री नीरजा यांनी संस्थेला दि. २५ फेब्रुवारी २०२४ रोजी सदिच्छा भेट दिली प्रथम त्यांना आमची श्रीवाणी चा अंक भेट देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले.

श्री मिलिंद दिक्षित यांनी त्यांना संस्थेत सुरु असलेले प्रकल्प व उपक्रमांविषयी माहिती दिली. मराठी भाषेविषयी सुरु असलेले विधायक कार्य पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले यावेळी त्यांचे यजमान देखील सोबत उपस्थित होते.

## जिल्हा निवडणूक कार्यालयातर्फे विद्यार्थ्यामध्ये जनजागृती

२०२४ मध्ये होऊ घातलेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये जास्तीत जास्त संख्येने तरुण मतदारांनी सहभागी व्हावे, या हेतूने जिल्हा निवडणूक कार्यालयातर्फे विद्यार्थ्यामध्ये जनजागृती करण्यासाठी जिल्हा निवडणूक शाखेचे अधिकारी श्री. बैसाणे यांनी विद्यार्थ्यांना निवडणूक यादीत नाव समाविष्ट करून मतदान कार्ड नोंदणी कशी केली जाते याचे स्लाईड शो द्वारे प्रशिक्षण दिले व मतदानाचा हक्क प्रत्येकाने बजवावा असे आवाहन केले. मतदान आपला हक्क व कर्तव्य आहे कुठल्याही प्रलोभनाला बळी न पडता मतदानाचा हक्क प्रत्येकाने बजवावा म्हणून शपथ देण्यात आली. यावेळी निवडणूक कार्यालयातील कर्मचारी व पदाधिकारी यांनी देखील मार्गदर्शन केले. तसेच निवडणूक कार्यालयातील कर्मचारी प्रसिद्ध शाहीर श्री सुभाष कुलकर्णी यांनी एक गीत सदर करून अतिशय मनोरंजक शैलीत विद्यार्थ्यांना उद्बोधन केले. या कार्यक्रमास संस्थेचे कर्मचारी, पदाधिकारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी स्वयंस्फुर्तीने निवडणूक कार्ड काढण्यासाठी नाव नोंदणी केली.




मतदान जनजागृती कार्यक्रमास उपस्थित पदाधिकारी व विद्यार्थी

# रेऊ वाणी विज्ञान विहार

## का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठान संचालित, रेऊ वाणी विज्ञान विहारतर्फे

## मराठी भाषा गौरवदिन साजरा

विद्यार्थ्यांना आपल्या मायबोली भाषेतून स्वतःचे मत व्यक्त करता यावे सभागृहात चार लोकांसमोर आपल्या भाषेतून बोलता यावं यासाठी दरवर्षी मराठी दिनाच्या निमित्ताने एक स्पर्धा आयोजित करण्यात येते. यावर्षी कथाकथन स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत विविध शाळांचे प्रथम फेरीत १३७ विद्यार्थी सहभागी झाले. शाळा पातळीवर त्यांची स्पर्धा घेऊन द्वितीय फेरीसाठी एकूण ३७ विद्यार्थी निवडण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमात या सर्व विद्यार्थ्यांनी आपले कथाकथन केले. मराठी दिनाच्या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. डॉ. मेधा उज्जैनकर यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा. राजश्री शेलकर या उपस्थित होत्या त्यांनीच परीक्षकाचीही भूमिका बजावली. उद्घाटनपर मार्गदर्शनात उज्जैनकर मॅडम यांनी विद्यार्थ्यांना आपण भाग्यवान असल्याचे सांगत मराठी भाषा किती प्रगल्भ आहे आणि त्या भाषेत तील साहित्य विविध कलाकृती आपल्याला स्वतः वाचता येतात याचा आपण अभिमान बाळगला पाहिजे. तसेच का स वाणी संस्थे च्या त्या विद्यार्थिनी आहेत. कुसुमाग्रजांच्या हस्ते झालेल्या संस्थेच्या भूमिपूजन सोहळ्याची मी स्वतः साक्षीदार असल्याचे सांगितले . प्रेक्षकांसमोर निकाल जाहीर करण्याआधी मधल्या वेळेत विचारपुष्पवाचक मंचाच्या सख्यांनी "तो तो चान ची तोमयी" या कार्यक्रमाद्वारे शालेय शिक्षण आनंदीदायी कसे करता येईल. हा गाभा असलेला अभिवाचनाचा कार्यक्रम देखील झाला.



द्वीपप्रज्वलन करतांना डॉ. मेधा उज्जैनकर, सौ. राजश्री शेलकर व उपस्थित मान्यवर

## समारोप कार्यक्रम

मराठी दिनाच्या समारोपाच्या कार्यक्रमाला मा उपकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद धुळे बी. एस. अकलाडे हे प्रमुख अतिथी होते तर संस्थेचे अध्यक्ष माजी कुलगुरू डॉ. प्राचार्य के. बी. पाटील हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. प्रा.आरती बरीदे , मेधा उज्जैनकर आदी मान्यवर ही या कार्यक्रमात उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते कथाकथन,कविता लेखन, कथालेखन स्पर्धेत विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देण्यात आली. विद्यार्थ्यांमधील सुप्त कवी व कथालेखकाला प्रोत्साहन देण्यासाठी रेऊ वाणी विज्ञान विहारातर्फे विविध शाळेतून विद्यार्थ्यांचे स्वनिर्मित एकूण ९० कविता व ३७ कथांचे मान्यवरांच्या हस्ते हस्तलिखित प्रकाशित करण्यात आले. याप्रसंगी मराठी भाषेचे संवर्धन जोपासना करण्यासाठीची सुरुवात शालेय जीवनापासूनच होणे गरजेचे आहे. असे अकलाडे सरांनी सांगितले. अनेक वर्षापासून विज्ञान विहार ही संस्था हे काम न थांबता करत आहे. त्यामुळे तुम्हा विद्यार्थ्यांना ज्या विविध संधी उपलब्ध होतात त्या संधीचा फायदा करून घ्या. या छोट्या छोट्या उपक्रमातूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असतो. यातून नक्कीच पुढे लेखक कवी निर्माण होतील यात शंका नाही असे म्हणत त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.



हस्तलिखिताचे प्रकाशन व बक्षिसाचे वितरण करतांना सन्माननीय मान्यवर

## विज्ञान सप्ताहात झालेली विविध व्याख्याने

## विज्ञान सप्ताह उद्‌घाटन समारंभ

का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठान संचलित रेऊ वाणी विज्ञान विहारातर्फे दरवर्षाप्रमाणे या वर्षीही विज्ञान सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत नवनवीन विज्ञानविषयांची माहिती पोहचावी म्हणून विविध शाळांमध्ये सात दिवस वेगवेगळ्या तज्ञांचे मार्गदर्शन आयोजित केले. विज्ञान सप्ताहाची सुरवात दि. २८ फेब्रु. रोजी राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त प्रा. रघुनाथ केले सभागृहात विविध शाळेंच्या १५० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत झाली. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन मा. डॉ. श्री. आशिष पानट यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून प्रिन्स या प्रकल्पाचे संस्थापक मा. अजय चांडक व प्रसिध्द भुलतज्ञ डॉ मानसी पानट, का.स.वाणी स्मृती प्रतिष्ठानच्या सचिव मा. प्रा. डॉ. शोभा शिंदे उपस्थित होते.

उद्‌घाटनपर मार्गदर्शनात डॉ. आशिष पानट यांनी सांगितले की मानवी शरीर हे फक्त जीवशास्त्र विषयाचा भाग नसून भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणित या सर्व विषयांचे एक पुस्तक आहे. C.V.Raman यांच्या नावाचा विस्तार करताना C - सायकल चालवणे V - विगर स्ट्रेंग्थ वाढविणे, R - रीस्टार्ट म्हणजेच अपयश आले तरी थांबून न जाता परत सुरुवात करणे A - अव्हाइड जंक फूड M - मेडीटेशन व योगा A - अव्हाइड नॉन रीन्युवेबल एनर्जी N - नो एडीक्शन यांचे पालन केले तर आपण आयुष्यात नक्कीच यशस्वी होऊ. अध्यक्षीय भाषण करताना डॉ. शोभा शिंदे यानी पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी रिड्यूस, रीयुज व रिसायकल या तीन घटकांचा वापर करणे व पर्यावरणाचे संवर्धन करण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.



द्वीपप्रज्वलन करून उद्‌घाटन करतांना डॉ. आशिष पानट व मान्यवर

## विज्ञान सप्ताह व्याखान दुसरे

विज्ञान सप्ताह निमित्त आयोजित व्याख्यान मालेच्या दुसऱ्या पुष्पच्या व्याख्याता मार्गदर्शक मा. डॉ.मानसी पानट या होत्या. त्यांनी कार्डीओ पल्मनरी रेस्क्सीटेशनचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करून दाखविले. तसेच रुग्णवाहिका येईपर्यंत आजूबाजूच्या लोकांची मदत घेऊन रुग्णाचे प्राण कार्डीओ पल्मनरी रेस्क्सीटेशनने वाचवायचा प्रयत्न करणे व या बाबत जास्तीत जास्त जनजागृती करण्याचे आव्हान त्यांनी केले.



मानवरांचे स्वागत करतांना सौ. सोनगिरे , प्रा.डॉ.शोभा शिंदे व प्रत्यक्षिक दाखवतांना डॉ.मानसी पानट

## विज्ञान सप्ताह व्याखान तिसरे

विज्ञान सप्ताह निमित्त आयोजित व्याख्यान मालेचे तिसरे पुष्प व्याख्याता मार्गदर्शक प्रा. अजय चांडक हे होते. विज्ञान आणि वैज्ञानिक दृष्टीकोन यावर मार्गदर्शन करतांना विज्ञान म्हणजे काय हे सांगितले. चांगल्या उद्देशांकारिता नैसर्गिक संभाव्यते मध्ये हेतुपुरस्सर बदल करणे म्हणजे विज्ञान होय, असे त्यांचे वैयक्तिक मत असल्याचे सांगितले व ते उदारणासह पटवून दिले. वैज्ञानिक दृष्टीकोन म्हणजे काय? विद्यार्थ्यांनी जागृत राहून तो कसा बाळगला पाहिजे याबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.




मार्गदर्शन करतांना प्रा. अजय चांडक व उपस्थित मान्यवर

## विज्ञान सप्ताह व्याखान चौथे

विज्ञान सप्ताह निमित्त आयोजित व्याख्यान मालेचे चौथे पुष्प मार्गदर्शक शास्रज्ञ विज्ञान लेखक, पद्मश्री मा. श्री शरद काळे हे होते आरोग्य आणि विज्ञान या विषयावर मार्गदर्शन करतांना त्यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाच समतोल राखण्यासाठी आज मानवाने प्रयत्न केले तरचं सर्व जीवसृष्टी आबादित राहू शकते. त्यासाठी लहान वयातच चागल्या सवयी विद्यार्थ्यांनी स्वतःला लावल्या पाहिजे त्या कोणत्या असाव्यात व घरातील कचरा व्यवस्थापन कसे करावे थर्माकोलचे पर्यावरणात न टाकता त्याचे विघटन कसे करावे यबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.



मार्गदर्शन करतांना मा.श्री.शरद काळे

## विज्ञान सप्ताह व्याखान पाचवे

विज्ञान सप्ताह निमित्त आयोजित व्याख्यान मालेचे पाचवे पुष्प व्याख्याता मार्गदर्शक बाल कल्याण समितीच्या सदस्या समुपदेशक मा. सुरेखा पाटील या होत्या. त्यांनी मानसिक आरोग्य या विषयावर मार्गदर्शन करतांना मुलांचे भावनिक आरोग्य जपण्यासाठी अल्बर्ट एलिस यांची वास्तवादी विचारसरणी वर आधारित विचार, भावना, वर्तन या संदर्भात विद्यार्थ्यांना थेरपी शिकविण्यात आली. योग्य विचार, योग्य भावना व योग्य कृती यशस्वीतेसाठी कसे काम करतात ते विविध उदाहरण देऊन समजावले . अभ्यास कसा करावा मानसिक स्वास्थ योग्य विचारांनी कसे जपावे हे सांगितले.



मार्गदर्शन करतांना प्रा.सुरेखा पाटील व उपस्थित मान्यवर

# बालनेत्र सुरक्षा प्रकल्प

जानेवारी ते मार्च २०२४ या दरम्यान धुळे जिल्ह्यातील शिंदखेडा तालुक्यात नेत्र तपासणीचे काम करण्यात आले तसेच धुळे येथील कमलाबाई प्राथमिक विद्यामंदिर व न्यू सिटी प्राथमिक विद्यालय येथेही नेत्र तपासणी करण्यात आली. जानेवारी ते मार्च दरम्यान एकूण २०६६२ विद्यार्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान ६४३ विद्यार्थ्यांना रेफर करण्यात आले त्यापैकी ११० विद्यार्थ्यांना तिरळेपणा असल्याचे निदर्शनास आले. तसेच आतापर्यंत १५ विद्यार्थ्यांना मोफत चष्मे देण्यात आले.


शस्त्रक्रियेपूर्वी


शस्त्रक्रियेनंतर


शस्त्रक्रियेपूर्वी


शस्त्रक्रियेनंतर

### तपासणी अहवाल तक्ता

| | जानेवारी ते मार्च २०२४ | ३१ मार्च २०२४ पर्यंत |
|---|---|---|
| Screened | २०६६२ | १००७८७ |
| Specs (School Camp) | १५ | १६७ |
| Refer (School) | ६४३ | ४५४९ |
| Visited | ६० | ६०३ |
| Surg. Suggested | ६ | ५४ |
| Surg. Done | २ | ३६ |
| G.P. given (S.N.) | ३१ | ३१३ |
| Higher Centre | १ | १३ |
| Patch | २ | ३४ |
| Cornea / Retina | ४ | ११ |
| Follow Up / medicine given | ७ | ११८ |

## का. स. वाणी स्मृती प्रतिष्ठान धुळे येथे महाराष्ट्र सेवा समितीचे अध्यक्ष मा. जीवन कायंदे व सौ. सिध्दी कायंदे यांची भेट

सानेगुरुजी बालमंदिर व प्राथमिक विद्यालय दोंडाईचा

दि. ३१ जानेवारी रोजी मा. जीवन कायंदे व सौ. सिध्दी कायंदे यांची फिल्डव्हिजिट आयोजित करण्यात आली. सध्या नेत्र तपासणी शिंदखेडा तालुक्यात सुरु असून दोंडाईचा येथील झोपडपट्टी विभागातील सानेगुरुजी बालमंदिर व प्राथमिक विद्यालय येथे विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. येथे एकूण ८७ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली असून तपासणी दरम्यान ५ विद्यार्थ्यांना शारदा नेत्रालयात रेफर करण्यात आले. तेथील मुख्याध्यापिका साधना पाटील यांचे कार्यक्रम आयोजनात मोलाचे सहकार्य लाभले.


विद्यार्थ्यांची नेत्रतपासणी करतांना

## नूतन माध्यमिक हायस्कूल दोंडाईचा

नूतन माध्यमिक हायस्कूल दोंडाईचा येथे अगोदरच नेत्र तपासणी झाली होती त्यात ज्या विद्यार्थ्यांना चष्मा नंबर आढळून आला त्या विद्यार्थ्यांना येथे चष्मा वाटप करण्यात आले. याप्रसंगी मा जीवन कायंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना ध्येय साध्य जोपर्यंत होत नाही तोपर्यंत चिकाटीने प्रयत्न करत राहिले तर यश मिळतेच असे सांगितले. सदर कार्यक्रमाला संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री हेमंतराव देशमुख यांनी स्वतः उपस्थित राहुन महाराष्ट्र सेवा समितीचे अध्यक्ष यांचे स्वागत केले व विद्यार्थ्यांना लाख मोलाची शरीर संपदा जपण्यासाठी मार्गदर्शन केले. याप्रसंगी प्राचार्य बी. बी. पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले होते, या उपस्थित मान्यवरांच्या हस्ते चष्मा वाटप करण्यात आले.



मान्यवरांच्या हस्ते चष्मा वाटप करतांना

## राणी मासाहेब मनुबादेवी राऊळ गर्ल्स हायस्कूल व जूनियर कॉलेज दोंडाईचा

राणी मासाहेब मनुबादेवी राऊळ गर्ल्स हायस्कूल व जूनियर कॉलेज दोंडाईचा येथे काही दिवसापूर्वी नेत्र तपासणी झाली होती त्यादरम्यान येथील विद्यार्थिनींना कपड्यांची गरज असल्याचे लक्षात आले त्यामुळे तेथे गरीब व गरजू मुलींना सौ. सिद्धी कायंदे यांच्या हस्ते कपडे वाटप करण्यात आले.



सौ. सिद्धी कायंदे यांच्या हस्ते कपड्यांचे वाटप करतांना

## महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक हायस्कूल विखुरले

महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक हायस्कूल विखुरले येथे पाहुण्यांचे लेझीम पथकाद्वारे स्वागत करण्यात आले. त्यानंतर छोटासा स्वागत समारंभ व शाळेतील मुलांची नेत्र तपासणी करून दर सहा महिन्यात शाळेला विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करता यावी यासाठी व्हिजन चार्ट व माहिती पुस्तिका देण्यात आली. या शाळेत १४० विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. त्यात ८ विद्यार्थ्यांना शारदा नेत्रालयात रेफर करण्यात आले. यादरम्यान विखुरले येथिल अंगणवाडीतील १ बालकालाही शारदा नेत्रालयात रेफर करण्यात आले.

गरीब व गरजू विद्यार्थ्यांनसाठी जुने पण चांगल्या स्थितीतील कपडे शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.रेखा पाडवी यांच्याकडे गरजेनुसार वाटप करण्यासाठी सुपूर्द करण्यात आले. शाळेच्या सर्व शिक्षक वृंद यांनी पाहुण्यांचे वाजत गाजत स्वागत करून नेत्र तपासणीस सहकार्य केले.या सर्व आयोजनात राष्ट्रीय बालसेवा स्वास्थ्य कार्यक्रमाच्या डॉ. युतिका भामरे यांचे मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.



महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक हायस्कूल चे मान्यवर व विद्यार्थी

# स्किझोफ्रेनिया अवेअरनेस असोसिएशन संस्था पुणे - उपक्रम



## तिळगुळ घ्या गोडगोड बोला

''सा'' संस्थेत मकर संक्रांतीचा सण दर वर्षी साजरा करण्यात येतो. या वर्षी १७ जानेवारी ला ''सा'' मध्ये मकर संक्रांतीनिमित्त पतंग उडविण्याचा आणि तिळगुळ वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला.

## ''सा'' संस्थेत विद्यार्थ्यांची भेट


''सा'' संस्थेमध्ये विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी भेट दिली. त्यामध्ये भारती विद्यापीठ, कावेरी महाविद्यालय, सिंहगड नर्सिंग कॉलेज आदि विद्यापीठांचा व महाविद्यालय समावेश होता. त्यानिमित्त साधारणतः १०० विद्यार्थ्यांना ''सा'' चे सचिव रवींद्रनाथ चंद्रन, आरती पंडित व सारिका चांडक यांच्याद्वारे मार्गदर्शन करण्यात आले व संस्थेविषयी माहिती देण्यात आली.



मार्गदर्शन करतांना रवींद्रनाथ चंद्रन, आरती पंडित व सारिका चांडक

## शुभार्थीसाठी दिव्यांग ओळखपत्र

'सा' संस्थेमधील शुभार्थीसाठी दिव्यांग ओळखपत्र मिळण्याबाबत त्यांच्या पालकांना श्री. महेश मिस्त्री यांच्याद्वारे मार्गदर्शन करण्यात आले त्यामध्ये 'सा' मधील शुभार्थींना प्राधान्य देण्यात येऊन ओळखपत्रचा लाभ झाला.



मार्गदर्शन करतांना श्री. महेश मिस्त्री

## ''सा'' संस्थेत भारत सरकारचा पुरस्कार

न्यू दिल्ली येथे महिला आणि मानसिक आरोग्य परिषद २०२४ चे 'भारत डायलॉग' यांनी आयोजन केले होते यामध्ये ''सा'' चे माजी अध्यक्ष श्री. अमृत कुमार बक्षी यांना लाईफ टाईम अचीवमेंट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच सा ला बेस्ट रिहॅबिलिटेशन सपोर्ट पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मा श्री. अमृत कुमार बक्षीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



## 'सा' शुभार्थींची पुणे शहरात सहल

२३ मार्च रोजी 'सा' शुभार्थींची एकदिवसीय सहल पुण्यातील ऐतिहासिक स्थळांवर आयोजित करण्यात आली होती शनिवार वाडा, लाल महाल, राजा दिनकर केळकर संग्रहालय इत्यादी स्थळांना भेट देण्यात आल्या.





सहलीत सहभागी शुभार्थी

## "सा" संस्थेस जागतिक बायपोलर दिवस साजरा




३० मार्च हा दिवस जागतिक बायपोलर दिवस म्हणून पाळला जातो, त्यानिमित्ताने 'सा' मध्ये जागतिक स्तरावर बायपोलर डिसऑर्डर बद्दल असणारा जनजागृती आणि सामाजिक कलंक दूर करण्यासाठी दिवस साजरा करण्यात आला. "सा" कुटुंब बायपोलर दिवसाला पाठिंबा देत आहे.

## शारदा नेत्रालय OPD रिपोर्ट

**OPD DETAILS**

| Period | Paid | Review Free | Express OPD | Subsidzed | Retina OPD | Paediatric OPD | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1st Jan'24 to 31st March'24 | 9861 | 3947 | 620 | 1235 | 702 | 84 | ***16449*** |

**OT DETAILS (Surgery Details)**

| Period | SICS Free | SICS Paid | Phaco | Retina | Other | Paediatric | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1st Jan'24 to 31st March'24 | 764 | 205 | 1308 | 49 | 245 | 5 | ***2576*** |

**का. स. वाणी स्मृति प्रतिष्ठान, धुळे**

**विद्यमान विश्वस्तांची यादी**

मा.सी.ए.श्री.शशिकांत धामणे (अध्यक्ष)

मा. प्रा.डॉ. शोभा शिंदे (सचिव)

मा. डॉ.के.बी. पाटील

मा. श्री. श्रीराम जगन्नाथ वाणी

मा. प्रा.डॉ. नटवरलाल जैन

मा. श्री. श्रीपाल मुणोत

मा. श्री. विवेक केले

मा. श्री. जितेंद्र सोनगिरे

**We accept donations from well-wishers**

K.S.Wani Memorial Trust
Current Account No. 48310010006917
IFSC Code IBKL0000483
IDBI Bank, Dhule (Maharashtra)

Reg. No. K.S. Wani Memorial Trust. No. E352/Dhule
FCRA Reg. No. 083820024
PAN No. AAATK9380K

**Contact:** K. S. Wani Memoral Trust,
Unnati Nager Nakane Road Deopur Dhule- 424002
(02562)223654, 9372810477
Email Id: kswmarathi@gmail.com
Please Visit: www.kswtrust.org